# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

जा.क्र.मनपा/नर/७९८/२१-२२

दिनांक -२८/५/२०२१

जनसंपर्क विभाग
आवक क्र. १२८
दिनांक ३१/५/२०२१

प्रति,
विभाग प्रमुख
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- जाहिर सुचना प्रसिद्धी करणेबाबत.

संदर्भ :- मा. महासभा, ठराव क्र. 12, प्रकरण क्र. 24, दि.11/11/2020

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनामध्ये फेरबदल करणेबाबत मा. महासभेने संदर्भिय ठरावान्वये मंजूरी दिलेली असून याबाबत जनतेच्या हरकती व सूचनासाठी अधिसूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

यास्तव सदरची मराठी व इंग्रजी भाषेतील अधिसूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व जास्ती खपाच्या मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**(दिलीप घेवारे)**
**प्र. सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सोबत :- जाहीर सुचनेची प्रत

प्रत - माहितीस्तव
स्विय सहाय्यक
मा. आयुक्त सो.,. दालन, मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
## ता. व जि. ठाणे

// **अधिसूचना** //

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदल)**

ज्या अर्थी, मिरा भाईंदर शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधण्यात येत आहे) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी, वगळलेल्या भागाची विकास योजना "उक्त अधिनियमाचे" कलम 37(1) नुसार शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/नपा/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजुर झाली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेने सर्व साधारण सभा ठराव क्र. 12, प्रकरण क्र. 24, दि.11/11/2020 अन्वये ठराव पारीत झाला असुन त्यामध्ये मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सर्व पक्षीय गटनेते, अधिकारी यांची समिती गठीत करुन समितीने अंतिम निर्णय घेऊन प्रशासनाने कलम 37(1) नुसार पुढील कार्यवाही करणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मा. महापौर यांनी सर्वपक्षीय गटनेते व अधिकारी यांचे समवेत बैठक घेवून नगररचना विभागाने सुचविल्यानुसार विषयांकित जागेवर दफनभुमीचे आरक्षण नव्याने दर्शविण्यासाठी तातडीने प्रस्ताव राज्यशासनाकडे मान्यतेकरीता सादर करणेस दि.12/05/2021 रोजी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम 37(1) नुसार मंजूर विकास योजनेमध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्याचे ठरविले आहे. यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधण्यात येत आहे.

"मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे काशी येथील "स.क्र. 70पै., 75पै., 76पै., 77पै., 78पै., 79पै., 82पै., 103पै." या 3 हेक्टर क्षेत्राच्या जमिनी **"दफनभुमी"** वापरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार फेरबदल करणे प्रस्तावित आहे."

आणि त्याअर्थी, उपरोक्त नमुद "उक्त फेरबदलाबाबत" ज्या नागरीकांना हरकती / सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी हरकती / सूचना लेखी स्वरुपात सदरची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 30 दिवसाच्या मुदतीपर्यंत सादर कराव्यात, म्हणजे सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी उक्त हरकती / सूचनांचा विचार करता येऊ शकेल.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी व माहितीसाठी महानगरपालिका मुख्य कार्यालयात व नगररचना विभागामध्ये कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

जा.क्र. मनपा/जनसंपर्क/०२८/२०२१-२२
दिनांक ३१/५/२०२१

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

## MAIN BRANCH, BHAINDAR (W)

LATE. INDIRA GANDHI BHAWAN, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ MARG,
BHAINDAR (W), TAL. & DIST. THANE 401 101

## NOTIFICATION

(UNDER SECTION 37 (1) OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT - 1966)

Whereas, the Development Plan of Mira Bhaindar Municipal Corporation has been sanctioned by the Govt. Under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Hereinafter referred to as "The Said Act") vide Notification No. TPS-1296/9847/CR-162/96, UD-12, Dt.14/05/1997 and came into force from the Dt.15/07/1997.

And whereas excluded portion has been sanctioned U/s. 37(1) of "Said Act" by the Govt. vide Notification No. TPS/1298/94/CR-89/98, UD-12, Dt.25/08/2000 and came into force from Dt. 15/10/2000.

And whereas, Mira Bhaindar Municipal Corporation has decided vide General Body Resolution No. 12, Chapter No. 24, dt.11/11/2020 has been passed in which a committee of all party group leaders and officials has been constituted under the chairmanship of the Mayor and the committee has taken a final decision and the administration has approved to take further action as per Section 37(1). In that connection, after a meeting with all party group leaders and officials, the mayor has instructed to immediately submit the proposal to the state government for approval to show the new reservation of Burial Ground on the subject place as suggested by the town planning department on Dt.12/05/2021. modify sanctioned Development Plan U/s. 37(1) of "The Said Act" as described below. Herein referred as "The Said Modification"

It is proposed to amend this 3 hectare area of "Land bearing "S.No.70pt., 75pt., 76pt., 77pt., 78pt., 79pt., 82pt., 103pt." at Village Kashi in Mira Bhaindar Municipal Corporation area as per Section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for "Burial Ground" purpose"

And therefore, those who wants to submit their suggestion / objection about the "said modification", may submit in writing there suggession / objection within one month from publications of this Notification in Government gazette, to the Mira Bhaindar Municipal Corporation which may be considered before finalizing the proposal.

The plan of proposed modification is kept open for Inspection for public in the Head Office and Townplanning Department of Mira Bhaindar Municipal Corporation during Office hours.

Ref No: MBMC/PRO/127/2021-22
Date: 31/05/2021

(Dilip Dhole)
Commissioner
Mira Bhaindar Municipal Corporation